# मुंबई विद्यापीठ

## ई-मासिक वार्तापत्र

नोव्हेंबर २०२४

वर्ष - ०३ • अंक ११



## नॅक द्वारा पुनर्मूल्यांकनामध्ये ३.६५ सीजीपीए सहित अ ++ श्रेणी
## विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा

# मुंबई विद्यापीठाची आशियाई क्रमवारीत मोठी झेप

## गतवर्षीच्या तुलनेत सर्वच निकषात उत्कृष्ट कामगिरी करत मोठी सुधारणा

## मागील वर्षीच्या १९ गुणांकनावरून ३४ गुणांसह दर्जेदार कामगिरी

## क्यूएस आशिया रँकिंग जाहीर, आशिया क्रमवारीत ६७ वरून ५२ क्रमांकावर झेप

मुंबई, ११ नोव्हेंबर – क्वाकरेली सायमंड ( क्यूएस) यांनी जाहीर केलेल्या आशियाई युनिव्हर्सिटी रँकिंग २०२५ मध्ये मुंबई विद्यापीठाने दर्जेदार कामगिरी करत मोठी झेप घेतली आहे. मुंबई विद्यापीठाने गतवर्षीच्या तुलनेत सर्वच निकषात मोठी सुधारणा करत २९१ ते ३०० या बँडमधून बाहेर पडत थेट २४५ क्रमांकावर झेप घेतली आहे. विद्यापीठाने मागील वर्षीच्या तुलनेत सर्वसाधारण गुणात उल्लेखनीय कामगिरी करत १९ गुणांवरून ३४ गुण प्राप्त केले आहेत. तर दक्षिण आशिया क्रमवारीत उत्कृष्ट कामगिरी करत ६७ क्रमांकावरून ५२ क्रमांक पटकावला आहे. नुकतीच आशियातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून सर्वोत्तम उच्च शिक्षण संस्थांच्या यादीत मुंबई विद्यापीठाची मोहोर उमटली आहे.

क्वाकरेली सायमंड ( क्यूएस) आशियाई युनिव्हर्सिटी रँकिंग २०२५ अहवालानुसार मुंबई विद्यापीठाने सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत रँकिंगच्या सर्व निकषात भरीव सुधारणा केली आहे. धोरणात्मक सुधारणेला प्राथम्य देऊन संस्थात्मक प्रतिष्ठा, रिसर्च आऊटपूट, वैश्विक सहभागिता अशा अनुषंगिक निकषांत विद्यापीठाने मोठी सुधारणा केली आहे. पेपर्स पर फॅकल्टी, नियोक्ता प्रतिष्ठा, शैक्षणिक प्रतिष्ठा, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क, विद्याशाखा-विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय विद्याशाखा गुणोत्तर, आणि पीएचडी असलेले शिक्षक यांसारख्या महत्त्वाच्या निकषात उल्लेखनीय कामगिरी करत विद्यापीठाने ७६ टक्क्यांनी सुधारणा करत दर्जेदार कामगिरी केली आहे. विद्यापीठाने इनबाऊंड आणि आऊटबाऊंड एक्सचेंज स्टुडेंट कॅटेगरीमधील मागील स्तर टिकवून ठेवले आहे.

क्युएसच्या विविध ११ निकषात मुंबई विद्यापीठाने सर्वाधिक पेपर्स पर फॅकल्टी निकषात सर्वाधिक ९०.६ गुण प्राप्त केले आहेत. त्यापाठोपाठ नियोक्ता प्रतिष्ठा ६४.१, शैक्षणिक प्रतिष्ठा ३४.६, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गुणोत्तर ३२.६, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क २१.३, विद्याशाखा-विद्यार्थी गुणोत्तर १४.२, आंतरराष्ट्रीय विद्याशाखा गुणोत्तर ९.१, पीएचडी असलेले शिक्षक ४.८, सायटेशन पर पेपर ३.८, आऊटबॉऊंड एक्सचेंज स्टूडेंट्स १.१ आणि इनबॉऊंड एक्सचेंज स्टुडेंट १ अशा विविध निकषात विद्यापीठाने उत्तम कामगिरी केली आहे.

> "विद्यापीठातील सर्व घटकांनी संशोधन आणि विकासाच्या प्रक्रियेत केलेल्या विशेष आणि साश्वत प्रयत्नांची ही फळनिश्पती आहे, या निकालाचे समाधान असून भविष्यात रँकिंगमध्ये सुधारणा करण्यासाठी सायटेशन पर पेपर आणि स्टुडेंट एक्सचेंज प्रोग्राम या निकषांवर अधिक भर देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील राहील."
>
> **- प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

# मुंबई विद्यापीठात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन




भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या समवेत इतर मान्यवर



भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या संविधान गौरव यात्रेचे क्षणचित्रे

मुंबई, दि. २६ नोव्हेंबरः भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त आज मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या समवेत विविध शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी-कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मूल्य, आदर्श आणि संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविकेचे/ उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात भारतीय



भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या संविधान गौरव यात्रेचे क्षणचित्रे



भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या संविधान गौरव यात्रेचे क्षणचित्रे

संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

संविधान दिनाचे औचित्य साधून शारिरीक शिक्षण विभागाच्या वतीने संविधान गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. आज आयोजित केलेल्या संविधान दिनाच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ५०० हून अधिक स्वयंसेवक, लेझिम पथक आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत मुंबई विद्यापीठास पहिल्यांदाच सुवर्ण पदक

### राज तिवारी यांस वैयक्तिक सुवर्णपदक तर पुरुष संघास प्रथमच उपविजेतेपद



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी करत सुवर्ण पदकाचा बहुमान पटकावणारा विद्यार्थी राज तिवारी



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत उपविजेते पदक प्राप्त चमू

दि. २१ नोव्हेंबरः मंगळूर विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण पदकाचा बहुमान मिळवला आहे. राज तिवारी या खेळाडूने ३० मिनिटे ५९ सेकंद वेळ देत वैयक्तिक सुवर्णपदक मिळवत मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात नोंद केली आहे. मुंबई विद्यापीठास पहिल्यांदाच क्रॉसकंट्री स्पर्धेत वैयक्तित गटात सुवर्ण पदक आणि पुरुष संघाला उपविजेते पदाचा बहुमान मिळाला आहे. भारतीय विद्यापीठ संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेसाठी भारतातील

१३७ विद्यापीठांतील ८५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

क्रॉसकंट्री स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या पुरुष संघाने ७१ गुण मिळवून पहिल्यांदाच उपविजेतेपद पटकावले. यामध्ये विजेत्या मंगळूर विद्यापीठास ६९ गुण मिळाले तर तृतीय क्रमांकाच्या विद्यापीठास ८३ गुण मिळाले. मुंबई विद्यापीठाच्या संघामध्ये राज तिवारी, मृणाल सरोदे, रोहन चौधरी, माणिक वाघ, सुरज झोरे आणि हेमंत निशाद यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. स्पर्धेतील खेळाडूंना सन्मानचिन्ह, रोख रक्कम आणि स्टॉप वॉच देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई विद्यापीठ संघाचे मार्गदर्शक म्हणून राहुल अकुल आणि व्यवस्थापक शशांक उपशेट्टे यांनी काम पाहिले.

क्रॉसकंट्री स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या संघाचे आणि सुवर्ण पदक विजेता राज तिवारी यांचे अभिनंदन करून भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

## मुंबई विद्यापीठाची चमू ठरली अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र
## पुरुष बॅडमिंटन संघ करणार मुंबई विद्यापीठाचे नेतृत्व




**पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास उपविजेतेपद मिळवून देणारी चमू**

मुंबई, दि. १८ नोव्हेंबरः सागर विद्यापीठ भोपाळ मध्यप्रदेश येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष बॅडमिंटन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने दर्जेदार कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठाचा पुरुष बॅडमिंटन संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला असून ही चमू मुंबई विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे. भारतीय विद्यापीठे संघाच्या वतीने सागर विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने उपविजेतेपद मिळवत अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. या संघात अभ्युदय चौधरी, इयान लोपीस, क्रिश देसाई, झाकुओ सेयी,अथर्व जोशी, सारांश गजबिये आणि सिद्धार्थ दास विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

पुरुष बॅडमिंटन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विरुद्ध ३-२ असा विजय मिळवला, तर देवी अहिल्या विद्यापीठ, इंदूर विरुद्ध ५-० असा विजय मिळवत जेजेटीयू, राजस्थान विरुद्ध अंतिम सामन्यात २-३ ने पराभूत होऊन उपविजेतेपद प्राप्त केले आहे. या स्पर्धेसाठी १०३ विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी,

प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी या चमूचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास सुवर्ण पदक



**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक प्राप्त करणारी विद्यार्थीनी श्रेया जाधव**

गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे दिनांक ११ ते १५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो मुलींच्या स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास सुवर्णपदक मिळाले आहे. ७३ किलो वजन गटात श्रेया जाधव या विद्यार्थीनीने सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. भारतीय विद्यापीठे संघाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी देशभरातील ८० विद्यापीठे सहभागी झाली होती. श्रेया जाधवने चंदीगड विद्यापीठ २-०, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ-नॉकआऊट, गौतम विद्यापीठ २-०, मणिपूर विद्यापीठ- नॉकआऊट, दिल्ली विद्यापीठ २-०, कृषी नन्नया विद्यापीठ, राजमुंद्री, आंध्रप्रदेश २-०, एमजीयु कोट्टायम (उपांत्य फेरी) २-० आणि गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर (अंतिम सामना) नॉकआऊट अशी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदावर नाव कोरले आहे. या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या वतीने विविध वजन गटातील ८ खेळाडू सहभागी झाले होते. श्रेया जाधव ने केलेल्या या सुवर्ण कामगिरीमुळे सर्वच स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्रेयाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास दोन कांस्य पदक



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये कांस्य पदक प्राप्त करणारा विद्यार्थी राज घुले




अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये कांस्य पदक प्राप्त करणारा विद्यार्थी सय्यद उमर

मुंबई, दि. १३ नोव्हेंबरः गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास दोन कांस्य पदक मिळाली आहेत. ६८ किलो वजन गटात सय्यद उमर आणि ८७ किलो वजन गटात राज घुले या विद्यार्थ्यांना कांस्य पदक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

भारतीय विद्यापीठे संघाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी देशभरातील १२७ विद्यापीठे सहभागी झाली होती.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने विविध वजन गटातील ८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अखिल

भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेमध्ये दोन कांस्य पदक प्राप्त केल्याबद्दल सय्यद उमर आणि राज घुले यांच्यासह प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

## ‘इंद्रधनुष्य’ वर मुंबई विद्यापीठाची विजयी पताका

## राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’वर मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर

### २० वर्षांच्या कारकिर्दीमध्ये तब्बल १९ वेळा विजयाचा बहुमान




राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’वर मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर उमटवणारी

मुंबई, दि. १२ नोव्हेंबर: २० व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’ मध्ये मुंबई विद्यापीठाने बाजी मारत अव्वल स्थान पटकावले आहे. ७ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या या युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर उमटली आहे. विशेष बाब म्हणजे आतापर्यंत मुंबई विद्यापीठाने स्पर्धेच्या २० वर्षाच्या कारकिर्दीमध्ये तब्बल १९ वेळा हा अंतिम सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक आपल्याकडे राखण्याचा बहुमान मिळविला आहे.

संगीत, साहित्य, आणि ललित कला या गटांतील स्पर्धांमध्ये विजयी सलामी देत सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने ९१ गुणांची कमाई करत सर्वसाधारण विजेतेपद मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे. द्वितीय क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यापीठास ७० गुण मिळाले आहेत. राज भवनद्वारे आयोजित या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’मध्ये राज्यातील २३ विद्यापीठे सहभागी झाली होती.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय समुह गायन, पाश्चिमात्य समुह गायन, वक्तृत्व आणि छायाचित्रण या स्पर्धांमध्ये सुवर्ण पदक मिळवून निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. यासोबत पाश्चिमात्य वाद्य, भारतीय शास्त्रीय नृत्य, प्रहसन, प्रश्नमंजुषा, आणि व्यंगचित्र या स्पर्धांमध्ये रौप्य पदक मिळाले आहे. तर लोकवाद्यवृंद, भारतीय शास्त्रीय तालवाद्य, भारतीय शास्त्रीय गायन, नाट्य संगीत, मुकनाट्य, वादविवाद आणि शोभायात्रा या स्पर्धांमध्ये कांस्य पदक प्राप्त झाले आहे. कुमारी शिवया शर्मा आणि

सुधांशू सोमण या विद्यार्थ्यांनी विविध सहा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन सर्वात जास्त बक्षिस मिळवून गोल्डन गर्ल आणि गोल्डन बॉयचा किताब मिळवला. विद्यापीठाच्या ५५ विद्यार्थ्यांच्या संघानी या सर्व कलाप्रकारात सहभाग घेतला होता.

या स्पर्धेसाठी मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय स्तरावरील विजेते व माजी विद्यार्थी विजय जाधव, साहिल जोशी, अभिजीत मोहिते, रोहन कोतेकर, विलास रहाटे, केशर चोपडेकर, महेश कापरेकर, सागर चव्हाण, आशिष पवार, अमित घरत, अमन सिंह आणि अमोल बावकर या सर्वांचे सहकार्य लाभले असून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील आणि सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी यशस्वीरित्या या स्पर्धेचे नियोजन केले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य. डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी विजयी चमूचे अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुंबई विद्यापीठाचे पूनर्परीक्षेचे निकाल विहित मुदतीत जाहीर

### बीएस्सी सत्र ६ चा निकाल ९ दिवसात तर बीकॉम सत्र ६ चा निकाल अवघ्या १६ दिवसात जाहीर

मुंबई, दि. १८ नोव्हेंबरः मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या पूनर्परीक्षांचे (एटीकेटी) निकाल वेळेत जाहीर करण्यात विद्यापीठाने यश मिळवले आहे. या परीक्षांतील तृतीय वर्ष बीएस्सी सत्र ६ चा निकाल ९ दिवसात तर बीकॉम सत्र ६ चा निकाल अवघ्या १६ दिवसात जाहीर करण्यात आला. त्याचबरोबर बीकॉम अकाऊंट अँड फायनान्स सत्र ६ परीक्षेचा निकाल २२ दिवसात तर बीएमएस सत्र ६ परीक्षेचा निकाल २० दिवसात जाहीर करण्यात आला आहे.

हिवाळी द्वितीय सत्र २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या बीकॉम सत्र ६ एटीकेटी परीक्षेसाठी १४ हजार १९१, तर बीएस्सी सत्र ६ साठी २ हजार ९२६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. बीकॉम अकाऊंट अँड फायनान्ससाठी १ हजार ३१ तर बीएमएस परीक्षेसाठी १ हजार ५४९ एवढे विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्याचबरोबर बीफार्म सत्र ८ चा निकाल १८ दिवसात तर बीआर्च सत्र ६ चा निकाल १४ दिवसात जाहीर करण्यात आला. जाहीर केलेले हे सर्व निकाल मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले. मूल्यांकनाचे काम जलदगतीने करून विहित कालावधीच्या आत निकाल जाहीर केल्याबद्दल सर्व संबंधित शिक्षक आणि प्रशासकीय यंत्रणेचे त्यांनी आभार मानले. तसेच उर्वरित परीक्षांचे निकाल जाहीर करण्याचे काम प्रगतिपथावर असल्याचेही त्यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे शूल्कासह ८ दिवसात सादर करण्याचे विद्यापीठाचे आवाहन

## विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी महाविद्यालयाची

मुंबई, दि. २८ नोव्हेंबरः मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता आणि नावनोंदणी संबंधातील आवश्यक कागदपत्रे येत्या ८ दिवसात विहित शूल्कासह विद्यापीठाकडे जमा करण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे. ३० सप्टेंबर २०२४ ही शूल्कासह कागदपत्रे जमा करण्याची अंतिम मूदत उलटूनही अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील कागदपत्रे अद्याप विद्यापीठाकडे जमा केलेली नाहीत. विहित मुदतीत जमा न केलेल्या कागदपत्रांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवले जातात, पर्यायाने पुढील शिक्षण आणि नोकरीच्या संधीमध्ये संभाव्य बाधा निर्माण होत असतात. त्यामुळे येत्या ८ दिवसात विहित शूल्कासह विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे विद्यापीठाकडे तात्काळ जमा करण्यात यावेत तसेच यापूढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या संभाव्य शैक्षणिक नुकसानाची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांची असणार असल्याचे विद्यापीठामार्फत सांगण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठामार्फत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे विहित मुदतीत जमा करण्यासाठी परिपत्रानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते.

प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतर त्याची नाव नोंदणी व पात्रता बाबतचे दस्तऐवज त्याच वर्षात जमा करणे आवश्यक असतानाही अनेक महाविद्यालयांमार्फत विहित मुदतीत कागदपत्रे सादर केली जात नाहीत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षात विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे पात्रतेसंबंधीत अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विद्यापीठामार्फत सुरुवातीला १५ फेब्रुवारी २०२४ या तारखेपर्यंत विहित शूल्कासह कागदपत्रे जमा करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ ही मुदतवाढ देण्यात आली होती.

वारंवार सूचना करूनही विहित कालावधीत शुल्कासह ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे पात्रता आणि नाव नोंदणीचे कागदपत्रे विद्यापीठाकडे जमा केली नाहीत अशा महाविद्यालयांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार. तसेच अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठामार्फत रद्द केले जातील याची सर्वस्व जबाबदारी संबधित महाविद्यालांची असणार असल्याचेही विद्यापीठामार्फत सांगण्यात आले आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे रांगोळी कार्यशाळेचे आयोजन




श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे



श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे

मुंबई, दि. १७ नोव्हेंबर: मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज रांगोळी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सर कावसजी जहाँगीर दीक्षान्त सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेसाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयातील निवडक ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राच्या वतीने बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविधांगी पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी



श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे



श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे



श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे



श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रातर्फे
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित
रांगोळी कार्यशाळेचे क्षणचित्रे

विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यामध्ये छायाचित्र प्रदर्शन, छायाचित्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि विविध कार्यशाळा अशा उपक्रमांचा समावेश आहे.

आज आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून नीतिन केणी, माजी अधिष्ठाता, ललितकला विद्याशाखा , मुंबई विद्यापीठ यांच्यासह जे.जे. स्कूल ऑफ आर्ट येथील माजी विद्यार्थीनी चित्रगंधा सुतार, स्वाती नागे आणि मुंबई विद्यापीठाचा माजी विद्यार्थी सुप्रसिद्ध रांगोळीकार विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरु प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## पेट आणि एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षा सुरळीत

## ३४६२ पेट आणि ३६६१ एलएलएमसाठी विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

## तांत्रिक कारणामुळे फक्त डोंबिवली येथील परीक्षा केंद्रावर न झालेली परीक्षा २४ नोव्हेंबर २०२४ ला होणार

मुंबई, दि. १७ नोव्हेंबरः मुंबई विद्यापीठातर्फे आज दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी विविध २१ केंद्रावर पी.एच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट) २०२४ आणि एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षेंचे आयोजन करण्यात आले होते. सेंटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) ऑनलाईन पद्धतीने या परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. काही परीक्षा केंद्रावरील अपवाद सोडता इतर सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडल्या. सकाळच्या सत्रात आयोजित करण्यात आलेल्या पेट परीक्षेसाठी काही केंद्रावर तांत्रिक कारणामुळे परीक्षा उशीरा सुरु झाली. मात्र कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान

होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांना त्यासाठी वाढीव वेळ देण्यात आला.

**पेट परीक्षेचा तपशील:**

पेट परीक्षेसाठी ५०२८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी ३४६२ एवढ्या विद्यार्थ्यांनी आज परीक्षा दिली तर १०४० एवढे विद्यार्थी अनुपस्थित होते. तर डोंबिवली केंद्रावरील ५२६ विद्यार्थ्यांची तांत्रिक कारणामुळे परीक्षा होऊ शकली नाही.

**एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षेचा तपशील:**

एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षेसाठी ४५५३ एवढ्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ३६६१ एवढ्या विद्यार्थ्यांनी आज परीक्षा दिली तर ३६८ विद्यार्थी परीक्षेला गैरहजर होते. डोंबिवली केंद्रावरील तांत्रिक कारणामुळे ५२४ विद्यार्थ्यांची परीक्षा होऊ शकली नाही.

डोंबिवली येथील सुरेखा सेंटर परीक्षा केंद्रावर तांत्रिक कारणामुळे न होऊ शकलेल्या पेट आणि एलएलएम परीक्षा फक्त याच केंद्रावरील परीक्षार्थींसाठी पुढील रविवारी दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्याचा निर्णय विद्यापीठामार्फत घेण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना परीक्षेचे ठिकाण आणि वेळ हे सुधारीत प्रवेश पत्राच्या (हॉल तिकिट) माध्यमातून स्वतंत्ररित्या लॉगिन ईमेलद्वारे कळविण्यात येणार आहे.


निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**डॉ. प्रसाद कारंडे**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai